।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Phone : (02462) 229242**
**Fax : (02462) 229572**

**OFFICE OF THE REGISTRAR**

**Website: srtmun.ac.in**
**E-mail: registrarsrtmun@gmail.com**


## परिपत्रक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ७९ नुसार अध्यापक व कर्मचारी यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण समितीचे गठन करण्यात आलेले आहे. तक्रार निवारण समितीने निर्णय दिल्यानंतर संबंधीत संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी सदर निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. ०२ जानेवारी २०१९ रोजी राजपत्र प्रसिध्द करून अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(यञ) व कलम ७२(१०) नुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसुरदार संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरूप परिनियम, २०१८ निर्गमित केला आहे.

सदर एकरूप परिनियमातील मुद्दा क्रमांक ०२(९) नुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमाक ०६) याच्या संबंधीत तरतुदीअन्वये घटीत करण्यात आलेल्या, विद्यापीठाच्या तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयाची यथोचितरित्या व सत्वरतेने अंमलबजावणी करण्यात किंवा त्याचे अनुपालन करण्यात हयगय केल्यास असे संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे विरूध्द कारवाई करण्यास पात्र ठरतात.

उपरोक्त एकरूप परिनियमातील तरतूद विचारात घेता तक्रार निवारण समितीने जो निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयाची अंमंलबजावणी संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी करणे आवश्यक आहे. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयाची अमंलबजावणी न करणे ही बाब संलग्निकरणाच्या शर्तीच्या अटींचा भंग झालेला आहे, असे समजून सदर परिनियमातील मुद्दा क्र. ३ नुसार संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेवर पुढील कारवाई करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव

जा.क्र आस्था/२/२०१९–२०/५९७
दिनांक: २६/१२/२०१९

प्रत :

१ मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

३. सिस्टीम एक्सपर्ट, तांत्रिक संगणक सहाय्यता कक्ष, यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.